# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे शाखा
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-४५४/२०२२ दिनांक :- ३१/०३/२०२२.

## वयोवृध्द महीला नागरिकाची फसवणुक झालेली ८४९००/- रुपयाची रक्कम परत मिळवुन देण्यात यश - सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी

दिनांक २९/०३/२०२२ रोजी सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारदार नामे श्रीमती गायत्री देवांग शर्मा, (जेष्ठ नागरिक) रा. ए-३०१ श्रीजी पार्क कॉ.ऑ.सो. जैसल पार्क मिरा रोड ता.जि. ठाणे ४०११०५ यांचे कडून तक्रारी अर्ज प्राप्त झालेला होता. तक्रारदार यांना दिनांक २८/०३/२०२२ रोजी रात्रीचे १०.२४ वा.दरम्यान अनोळखी नंबर वरुन स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेचे कस्टमर केअर असल्याचे सांगुन त्या इसमाने सांगितल्या प्रमाणे तक्रारदार यांनी Anydesk App डाऊनलोड करण्यास सांगितले.त्यानंतर तक्रारदार यांचे SBI **बँक खात्यातुन एकुण रुपये ८४,९००/-** कपात झाल्याचा मॅसेज त्यांना प्राप्त झाला. त्यावेळी तक्रारदार यांची अनोळखी नंबर कडुन फसवणूक झाल्याची निदर्शनास आलेने त्यांनी तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे दिला.

सदरची तक्रार प्राप्त होताच सायबर गुन्हे कक्षाने तात्काळ कारवाई करीत तक्रारदार यांना आलेला मॅसेजचे अवलोकन केले असता सदरची रक्कम ही फ्लिपकार्टला गेल्याचे दिसुन आल्याने सायबर गुन्हे कक्ष यांचे निर्देशावरुन फ्लिपकार्ट कंपनीने तक्रारदार यांची फसवणुकीबाबतचे ट्रान्झॅक्शन तात्काळ रद्द करुन फसवणुक झालेली **एकुण ८४,९००/- रु** रक्कम तक्रारदार यांचे बँक खात्यावर परत जमा केलेली आहे.

सायबर गुन्हे कक्ष यांचेकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, बँक कर्मचारी कधीही ग्राहकांना मोबाईलवर संपर्क साधून बँक खात्याबाबत गोपनीय माहिती मागत नाहीत, त्यामुळे बँक कर्मचारी असल्याची बतावणी करणा-या कोणत्याही कॉलवर वैयक्तिक माहिती देवू नये.

सदरची कामगिरी मा.श्री.डॉ.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुजितकुमार गुंजकर, पोनि/ सायबर गुन्हे शाखा,श्री. स्वप्निल वाव्हळ, सपोनि /सायबर गुन्हे शाखा, श्री.प्रसाद शेनोळकर, पोउनि/सायबर गुन्हे शाखा, पोअंम/१२९५ गणेश इलग, मपोशि/सुवर्णा माळी, सेल, मपोशि/ माधुरी धिंडे, सायबर क्राईम सेल यांनी केली असुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम ८४९००/- रु पुर्ण रक्कम त्यांना परत मिळवून देण्यात आलेली आहे.

----